सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर यांचे मत

श्री. रघुनाथ बापूराव मुळीक, रा. बाबू पार्क, बहिरेवाडी फाटा, वाठार कोडोली, मु. बहिरेवाडी, पो. वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचे ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूरमध्ये दाखल ग्राहक तक्रार क्र. २०४/२००८ बाबत सदस्य सचिव यांचे मत खालील प्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

वितरण कंपनीने कोणत्याही प्रकारचे वीज कनेक्शन देतांना होणार असलेल्या वापराप्रमाणे त्याची वर्गवारी उदा. घरगुती, व्यापारी, औंद्योगिक, शेती,यंत्रमाग, कुक्कुट पालन वगैरे ठरविलेले आहे व त्यानुसार प्रत्येक वर्गवारीचा वीज वापराचा प्रती युनिट दर ठरविलेला आहे. तक्रारदार श्री. रघुनाथ बापूराव मुळीक यांना घरगुती कारणासाठी वीज कनेक्शन त्यांच्या पक्क्या बांधलेल्या नव्हे तर पत्र्याच्या तात्पुरत्या शेडमध्ये घेतले होते व सदर कनेक्शन तेथे शेजारी होणार असलेल्या पक्क्या घराच्या बांधकामासाठी देण्यात येत असल्याचे वितरण कंपनीच्या शाखा कार्यालय पोखलेच्या कनिष्ठ अभियंता, यांचे दि. ३०.१२.२००६चे कोटेशनवर नमूद करण्यात आलेला आहे. तसेच कार्यपध्दतीप्रमाणे कोणतेही कनेक्शन प्रथमत: तात्परत्या जागेत घेवून नंतर शेजारी पक्के बांधकाम करुन त्यात स्थलांतरीत करुन घेतले जात नाही. त्यामुळे संबंधित तक्रारदाराने अशा प्रकारे पक्क्या घराच्या बांधकामासाठी सदर कनेक्शन तात्परत्या शेडमध्ये घेतलेचे स्पष्ट होत आहे. तसेच अर्जदारास ग्राम पंचायतीकडून तात्पुरत्या बांधकामास ना हरकत दाखला मिळाला नसल्यामुळे त्यांनी कार्यकारी दंडाधिकारी, पन्हाळा यांचेसमोर प्रतिज्ञापत्र क्र. ९३५८ दि. २०.१२.२००६ करुन त्यात सदर कनेक्शन अधिकृत व कायदेशीर ठरण्यास अडचण निर्माण झाल्यास, ते बंद करण्याची कारवाई झाल्यास त्यास संमत्ती राहणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. वितरण कंपनीच्या टॅरिफ कोडप्रमाणे ऑक्टोबर २००६ ते एप्रिल २००७ कालावधीमध्ये रु. ८.५० प्रति युनिट, मे २००७ ते मे २००८ रु.१०.५० प्रति युनिट, जून २००८ नंतर पुढे रु. १२.०० प्रति युनिट असे बांधकामासाठी वीज वापराचे दर मा. वीज नियामक आयोगाच्या मान्यतेनुसार (केस क्र. ६५/२००६) विद्युत वितरण कंपनीकडून ठरविलेले आहेत. जर संबंधित अर्जदाराचा केवळ थेट घरगुती कनेक्शन घेण्याचा हेतू असता तर प्रथम तात्परत्या शेडमध्ये कनेक्शन घेवून त्यानंतर ते शेजारी बांधकाम केलेल्या पक्क्या घरात शिफ्ट करणे असे दोन टप्पे करण्याची आवश्यकता नव्हती. त्यामुळे तात्परत्या शेडमध्ये घेतलेले कनेक्शन हे पक्क्या घराच्या बांधकामासाठीच घेतले हे सिध्द होते. त्यामुळे टॅरिफ कोडनुसार बांधकामासाठी असलेल्या दराच्या फरकाची रक्कम दि.१२.१.२००७ पासून रु.७,९९५/- ग्राहकाने भरणे बंधनकारक आहे. तसेच ग्राहकाने जोडलेल्या विद्युत उपकरणामध्ये सिंगल फेज विद्युत मोटारपंपाचाही समावेश आहे, जो घराच्या तात्पुरत्या शेडमध्ये घेतलेल्या कनेक्शनला त्याची आवश्यकता वाटत नाही.

येणेप्रमाणे सदस्य सचिव यांचे म्हणणे या ठिकाणी संपवण्यात येते.

## आदेश

१) टॅरिफ कोडनुसार दि. १२.१.२००७ ते २१.१.२००८ या कालावधीत ग्राहकाने बांधकामासाठी वापरलेल्या विजेच्या फरकाची रक्कम रु. ७,९९५/- ही ग्राहकाने भरणे बंधनकारक आहे. सदर रकमेचे ५ हप्ते करुन देण्यात यावेत व बिलाचा हिशोब ग्राहकास समजावून सांगण्यात यावा.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी करणेत यावी व ती केलेची महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ कलम ८-७) च्या तरतुदीनुसार मंचास कळविण्यात यावे.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपिल करावयाचे असल्यास आदेशाच्या तारखेनंतर ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल, बांद्रा- कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई- ५१ यांजकडे करता येईल.

(एस.आर.बांबळे)
सदस्य सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर